# जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी

## तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे समोर

**(महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये ठराव व दुरुस्ती)**

---

वाचावे :-**महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) मधील तरतुद**

| | |
|---|---|
| १) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेळीमेंढी पालन सहकारी संस्था मर्या, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर<br>२) संजिवनी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या, पिपंळगाव कोझिरा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर<br>३) श्री वेताळनाथ सहकारी दुध उत्पादक संस्था मर्या, गुंजाळवाडी ता. संगमनेर, जि. अहमदनगर<br>४) श्री. दत्त दिंगबर सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्या, माहेगाव (देशमुख ), ता. कोपरगाव, जि. अहमदनगर | **अर्जदार** |
| जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | **प्रतिवादी क्रं.०१** |
| उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, संगमनेर/कोपरगांव | **प्रतिवादी क्रं.०२** |

**(या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठी दिनांक ७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीतील मयत प्रतिनिधीचे नावात बदल करण्याबाबत नियम १० (४) नुसार प्राप्त झालेल्या ठरावा बाबतची सुनावणी)**

**प्रस्तावना** -

दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठीची निवडणुक प्रक्रिया सुरु झालेली असुन प्रस्तुत निवडणुक प्रक्रियेत बँकेची मतदारांची अंतिम मतदार यादी या कार्यालयामार्फत दिनांक ०७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद १ ते ४ अर्जदार सभासद संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) नुसार त्यांचे दरम्यानचे काळात मयत झालेल्या प्रतिनिधीचे नाव बदलण्यासाठीचे ठराव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे कार्यालयाकडुन या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यानुषंगाने सर्व संबधितांना या कार्यालयाने दिनांक २०/०१/२०२१ रोजी सुनावणी देऊन दाखल केलेल्या ठरावांची व कादपत्रांची पडताळणी केलेली आहे.

**निष्कर्ष व अभिप्राय** –

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) निवडणुक नियम २०१४, नियम १०(४) मध्ये संस्थेने प्रतिनिधित्वाबाबत केलेला ठराव हा प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास अथवा संस्थेची समिती सदस्य नव्याने निवडणुक होऊन नविन समिती सदस्य निवडुन आल्यास ठराव बदल करता येईल अशी तरतुद विचारात घेता उपरोक्त १ ते ०४ संस्थानी त्यांचे यापुर्वी प्रतिनिधी म्हणुन नियुक्त केलेल्या व्यक्तिंचे मृत्यु झाल्या कारणाने नव्याने दाखल केलेले प्रतिनिधी बदलाचे ठराव हे कायदेशिर असल्याचे दिसुन आलेले आहे.

-कृ.मा.प.

उपरोक्त वस्तुस्थिती पहाता, उपरोक्त नमुद १ ते ०४ यांचे नविन प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करणे कायदेशीर होईल या निर्णयाप्रत येऊन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

- आदेश -

१. मी डॉ ज्योती लाठकर, जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक मला महराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त् १ ते ०४ अर्जदार संस्थेंचा दावा / ठराव मान्य करण्यात येत आहे.

२. बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी प्रसिध्द केलेल्या **गट ब- शेतीपूरक तसेच शेती माल प्रक्रीया व पणन संस्था-** दुध संस्था,पशुपैदास संस्था वराह पालन संस्था, कुक्कुटपालन संस्था, मंच्छिमार संस्था, शेळी मेंढी पालन संस्था, पाणी पुरवठा संस्था, फळबाग संस्था, शेंग उत्पादक संस्था, खरेदी विक्री संघ, सहकारी साखर कारखाने, जिनिंग प्रेसिंग संस्था, शेतकरी संघ, ऑईल्स मिल्स (डाळ, तेल प्रक्रीया इ. ) सुतगिरण्या, इतर प्रोसेसिंग संस्था इतर मार्केटिंग संस्था तसेच तत्सम इतर सहकारी संस्था मतदार संघात सोबत जोडलेल्या **परीशिष्टा**प्रमाणे संस्थाचे नावासमोरील यापुर्वीचे प्रतिनिधीचे नाव वगळुन नविन ठरावान्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्रतिनिधीचे नाव समाविष्ट करण्यात येत आहे.

( ज्योती लाठकर )
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

**स्थळ – नाशिक**
**दिनांक – २०/०१/२०२१**

४४५ जा.क्र.विनि-३/अेडीसीसीबँक/नियम १०(४)/निर्णय/२०२१
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक
विभाग, नाशिक यांचे कार्यालया, तिसरा मजला,
गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक
दिनांक – २०/०१/२०२१

**प्रत –**

१. अर्जदार / प्रतिवादी.
२. निवडणुक निर्णय अधिकारी दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर

२/- उक्त आदेशान्वये सोबतचे **परीशिष्टा** प्रमाणे झालेला बदल अंतिम मतदार यादीत ग्राहय धरुन उचित कार्यवाही करण्यात यावी

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**

१) जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर

## परिशिष्ट

**दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२१ ते २०२५-२६**

**गट ब- शेतीपूरक तसेच शेती माल प्रक्रीया व पणन संस्था-** दुध संस्था,पशुदैदास संस्था वराह पालन संस्था, कुक्कुटपालन संस्था, मच्छिमार संस्था, शेळी मेंढी पालन संस्था, पाणी पुरवढा संस्था, फळबाग संस्था, शेंग उत्पादक संस्था, खरेदी विक्री संघ, सहकारी साखर कारखाने, जिनिंग प्रेसिंग संस्था, शेतकरी संघ, ऑईल्स मिल्स (डाळ, तेल प्रक्रीया इ. ) सुतगिरण्या, इतर प्रोसेसिंग संस्था इतर मार्केटिंग संस्था तसेच तत्सम इतर सहकारी संस्था मतदार संघ

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक )निवडणुक नियम, २०१४ मधील नियम १० (४) नुसार पुर्वीचे प्रतिनिधी नाव वगळुन नविन प्रतिनिधीचे नाव समाविष्ट करणे

| तालुका | अंतिम मतदार यादीतील अ.क्र. | सभासद संस्थेचे नांव | वगळण्यात येणाऱ्या प्रतिनिधीचे नांव | नविन सभासदाचे नांव | वय | लिंग | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोपरगाव | 38 | श्री. दत्त दिंगबर सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्या. माहेगाव (देशमुख), ता. कोपरगाव, जि. अहमदनगर | देशमुख साहेबराव भास्करराव | लांडगे शिवाजी देवराम | 49 | पुरुष | मु.पो.माहेगाव देशमुख, ता. कोपरगाव |
| संगमनेर | 110 | श्री वेताळनाथ सहकारी दुध उत्पादक संस्था मर्या, गुंजाळवाडी ता. संगमनेर, जि. अहमदनगर | गोफणे रामनाथ कोंडाजी | गुंजाळ भास्कर काशिनाथ | 55 | पुरुष | मु. पो. गुंजाळवाडी, ता. संगमनेर |
| संगमनेर | 225 | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेळीमेंढी पालन सहकारी संस्था मर्या, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | मुन्तोडे रघुनाथ सोनाजी | शेख दिलखुश इब्राहीम | 45 | पुरुष | मु.पो. शिबलापुर, ता. संगमनेर, |
| संगमनेर | 229 | संजिवनी सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्या, पिंपळगाव कोझिरा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | मोरे बाळासाहेब बबनराव | खिलारी चंद्रकांत विश्वनाथ | 48 | पुरुष | मु.पो. पिंपळगाव कोझिरा, ता. संगमनेर |

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक